दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
• वर्ष १६ वे • अंक २४७ • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरुवार दि.२ डिसेंबर २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# अवकाळी पावसाचा राज्यात हाहाकार; जनजीवन विस्कळीत

**दै.रायगड नगरी । मुंबई**

आग्नेय अरबी समुद्र व लगतच्या लक्ष्यद्वीप बेट समुह ते उत्तर महाराष्ट्र किनारपट्टीपर्यंत कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे. त्यामुळे संपूर्ण कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात बहुतांश ठिकाणी जोरदार ते मध्यम स्वरुपाचा पाऊस होत आहे. या पावसामुळे संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले आहे. त्याचवेळी थायलंड परिसरात निर्माण झालेले कमी दाबाचे क्षेत्र बंगालच्या उपसागर आणि अंदमान समुद्रात आले असून त्याचे येत्या दोन दिवसात चक्रीवादळात रुपांतर होण्याची शक्यता आहे. ते ४ डिसेंबर रोजी आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीलगत धडकण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुढील काही दिवस दक्षिण भारतात अनेक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे.

लक्ष्यद्वीप बेट समुहापासून उत्तर महाराष्ट्रापर्यंत पसरलेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे राज्यात सध्या पाऊस पडत आहे. २ डिसेंबर रोजी कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात सर्वदूर पावसाची शक्यता असल्याचा इशारा हवामान विभागाने दिला



आहे. बुधवारी सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत पडलेला पाऊस (मिमी) पुणे १६, लोहगाव १६, कोल्हापूर २, महाबळेश्वर ६, नाशिक १९, सातारा २, मुंबई २८, सांताक्रूझ २९, अलिबाग २२, रत्नागिरी २, डहाणु १२, ठाणे २७ औरंगाबाद २ मिमी पावसाची नोंद झाली आहे. ३ डिसेंबर रोजी रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे. अहमदनगर, पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, औरंगाबाद, बीड आणि उस्मानाबाद जिल्ह्यात तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. विदर्भातही तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे.

दक्षिण थायलंड परिसरात निर्माण झालेले कमी दाबाचे क्षेत्र मंगळवारी मध्य अंदमान समुद्र परिसरात आले आहे. ते पश्चिम वायव्य दिशेला सरकून बंगालच्या उपसागरात गुरुवारी प्रवेश करेल. त्यानंतर त्याची तीव्रता वाढत जाईल. त्यानंतर त्याचे रुपांतर चक्रीवादळात होईल. ४ डिसेंबर रोजी हे चक्रीवादळ आंध्र प्रदेश – ओडिशाच्या किनारपट्टीवर धडकण्याची शक्यता आहे.

# देशात नवा मजबूत पर्याय उभा करणे गरजेचे : शरद पवार

**दै.रायगड नगरी । मुंबई**



मुंबई दौऱ्यावर असलेल्या पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा आणि महाविकास आघाडीचे शिल्पकार शरद पवार यांची त्यांच्या सिल्व्हर ओक या मुंबईतील निवासस्थानी भेट घेतली. या बैठकीनंतर शरद पवार यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. पवार म्हणाले की, पश्चिम बंगाल आणि महाराष्ट्राचं जुनं नातं आहे. हे नातं अधिक सकस होण्यासाठी ममता बॅनर्जी मुंबईत आल्या आहेत. आज मी आणि माझ्या सहकाऱ्यांची त्यांनी भेट घेतली. राष्ट्रीय स्तरावर जी परिस्थिती आहे ती पाहता सर्वांनी एकत्र येणं गरजेचं आहे. देशात एक नवा मजबूत पर्याय उभा करणे अत्यंत आवश्यक आहे, असे पवार यांनी सांगितले.

काँग्रेस या नव्या एकत्रिकरणात असेल का असा प्रश्न विचारल्यानंतर पवार म्हणाले की, काँग्रेसबाबत मी बोलत नाही, मी म्हणतोय की सर्वांनी एकत्र येण्याची आज गरज आहे. केंद्रात निर्माण झालेल्या परिस्थितीविरोधात जे कोणी लढायला तयार आहेत, अशा सर्वांना एकत्र घेतलं जाईल असे पवार म्हणाले. ममता बॅनर्जी आणि आमच्यात अतिशय सकारात्मक चर्चा झाल्याचंही पवार यांनी म्हटले आहे.

काल पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे आणि शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी ममता बॅनर्जी यांची ट्रायडंट हॉटेलमध्ये भेट घेतली. दोन वर्षांपूर्वी देखील उद्धव आणि मी संजय राऊत त्यांची भेट घेतल्याची आठवण या भेटीनंतर आदित्य ठाकरे यांनी काढली होती. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या दोघांध्ये एक वेगळे नाते असल्याचेही ते म्हणाले. दोघांमध्ये नेहमीच समन्वय राहिलेला आहे. मग तो कोविडचा प्रश्न असो की इतर राजकारण असेल. मुख्यमंत्री ठाकरे आणि ममतादीदी यांचं जे नातं असंच पुढे घेऊन जायचं आहेच, असे आदित्य ठाकरे यांनी म्हटले आहे.

## देशात आता युपीए शिल्लक राहिलेले नाही : ममता बॅनर्जी




माझ्या मुंबई दौऱ्यात मला मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना भेटायचे होते. मात्र त्यांना भेटता आले नाही. आज मी शरद पवार यांची भेट घेतली. देशात फॅसिझमचे वातावरण असून या फॅसिझमच्या विरोधात एक मजबूत आघाडी बांधली पाहिजे. त्यासाठी सर्वांनी एकत्र येणं आवश्यक आहे. सर्वांनी लढलं पाहिजे असं मला वाटतंय, असे ममतादीदी म्हणाल्या. यावर पत्रकारांनी शरद पवार यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याला यूपीएचे नेतृत्व करायला हवे का?, असा प्रश्न विचारला. ममतादीदींना हा सवाल तितकासा रुचला नाही. या प्रश्नाला उत्तर देताना त्या म्हणाल्या की, देशात आता यूपीए शिल्लक राहिलेलं नाही.

# तळा तालुक्यातील अवैध दारू व्यवसायासाठी अभय स्थानिक पोलिसांचे की उत्पादन शुल्क विभागाचे

**दै.रायगड नगरी । संजय रिकामे**

**तळा** : तळा तालुक्यात अवैध दारू व्यवसाय करणाऱ्यांना अभय कोणाचे? असे बोलण्याची वेळ तळेवसियांवर येऊन ठेपली आहे. सर्रासपणे अवैध देशी आणि विदेशी दारू ग्रामीण आणि शहरी भागात गल्लोगल्ली विकत आहेत परंतु त्यांच्यावर कारवाई होणार तरी कधी? असा सवाल नागरिक करीत आहेत. तसेच अवैध दारु व्यवसाय करणाऱ्यांना अभय स्थानिक पोलीस की राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी देतात? हे मात्र गुलदस्त्यातच आहे.





तळा शहर आणि ग्रामीण भागात अवैध दारू व्यवसायाला ऊत आल्याचे स्पष्ट दिसत आहे. हे अवैध दारू माफिया कोणाच्या अधीपत्याखाली ही दारू विक्री सुरू आहे असा प्रश्न आता नागरिकांना पडला आहे.

गल्लीबोळात दारू विक्री करणाऱ्या माफियांना विचारण्यास गेल्यास हमरीतुमरीवर येतात अवैध धंदे करत असताना यांच्यावर कोणत्याच प्रकारची कारवाई होत नसल्याने आता राज्य उत्पादन शुल्क प्रशासनावर प्रश्न चिन्ह निर्माण होताना दिसत आहेत आता या माफियांवर राज्य उत्पादन शुल्क प्रशासन कारवाई करणार का? हा महत्वाचा मुद्दा असेल.

या दारू माफियांचा गॉडफादर कोण आहे? तो गॉड फादर कोणाच्या नावाखाली सर्रासपणे दारू विक्री करतोय? यामध्ये कोण कोण सामील आहेत? हे प्रशासना समोर मोठे आव्हान आहे. अवैध दारू विक्री कडे प्रशासन धृतराष्टाची भूमिका घेत असल्याचे सवाल जनतेतून केले जात आहेत. तालुक्यात अवैध दारू विक्री होत असताना त्यांच्यावर कारवाई होत नाही त्यामुळे अवैध दारू विक्रीचे खुलेआम प्रमाण वाढले आहे. अनेकजण लॉकडाऊनमुळे या व्यवसायात उतरले असल्याची माहिती दिली जात आहे. यापुढे अवैध दारू विक्रीवर योग्य कारवाई होईल का? याकडे जनतेचे लक्ष वेधले आहे.

## संक्षिप्त...

### तिन्ही कृषी कायदे अखेर रद्द; राष्ट्रपतींनी शिक्कामोर्तब केले

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**


शेतकऱ्यांचा तीव्र विरोध आणि प्रदीर्घ संघर्ष यामुळे केंद्रातील मोदी सरकारला तीन कृषी कायदे रद्द करावे लागले असून हे कायदे रद्द करण्याची प्रक्रिया अखेर आज पूर्ण झाली. हे कायदे मागे घेण्यासाठी संसदेत आणलेल्या विधेयकावर राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी आज आपली अंतिम मोहर उठवली. दरम्यान, एकीकडे हे कायदे रद्द करण्यात आले असले तरी सिंघू सीमेवर गेल्या एक वर्षापासून सुरू असलेले शेतकऱ्यांचे आंदोलन अजूनही सुरूच असून ३८ संघटनांनी आज संयुक्त निवेदन जारी करत आम्ही एकजूट असल्याचे ठणकावून सांगितले आहे.

राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी शिक्कामोर्तब केल्याने तीन कृषी कायदे रद्द करण्याची औपचारिकता आज पूर्ण झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला संबोधित करून हे तिन्ही कृषी कायदे मागे घेण्याची घोषणा केली होती. त्यानंतर हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी संसदेच्या दोन्ही सभागृहांत हे कायदे मागे घेण्यासाठी विधेयक मांडण्यात आले. यावेळी विरोधकांनी चर्चेची मागणी केली असता ती फेटाळण्यात आली आणि गोंधळातच चर्चेविना आवाजी मतदानाने हे विधेयक मंजूर करण्यात आले. आज राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीने पुढील प्रक्रिया पूर्ण झाली असली तरी शेतकऱ्यांचे आंदोलन काही थांबले नसल्याने सरकारपुढील पेच कायम आहे. सिंघू सीमेवर गेल्या एक वर्षापासून शेतकरी ठाण मांडून आहेत. पंतप्रधान मोदींच्या घोषणेनुसार तिन्ही कृषी कायदे रद्द झाले असले तरी शेतकरी मागे हटलेले नाहीत.

# पनवेल शहर वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी विजय कादबाने

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या वरीष्ठ पोलीस निरीक्षकपदी विजय कादबाने यांनी आज (बुधवार दि.१ डिसेंबर) पदभार स्वीकारला. पनवेल शहरचे मावळते वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजयकुमार लांडगे यांना सहाय्यक पोलीस आयुक्तपदी पदोन्नती मिळाली असून अजयकुमार लांडगे यांनी विजय कादबाने यांना पनवेल शहर पोलीस ठाण्याचा बुधवारी पदभार सुपूर्द केला.



यावेळी त्यांचे खारघर पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक संदीपान शिंदे, पनवेल तालुका पोलीस निरीक्षक (गुन्हे) अंकुश खेडकर, गुन्हे शाखा युनिट ३ चे सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर पवार, तळोजा वाहतूक विभागाचे पोलीस उपनिरीक्षक सुनील सावंत, मुंबई पोलीस निरीक्षक अनिल पडवळ यांच्यासह पोलीस अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आदींनी भेट घेऊन तसेच दूरध्वनीद्वारे विजय कादबाने यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# विद्या संकुलात किलबिलाट ; शिक्षक, विद्यार्थी, पालक आनंदीत



**दै.रायगड नगरी । दिपक घोसाळकर**

**कळंबोली** : तब्बल पावणे दोन वर्षाच्या कालावधीनंतर शासनाने दिलेल्या निर्देशानुसार कळंबोली येथील सुधागड विद्या संकुलात कीलबीलाट ऐकायला मिळाला. शाळेची घंटा आणि शाळेचा परिपाठ नित्यनेमाने पुन्हा सुरू झाला. विद्यार्थी, पालक शिक्षक व अन्य कर्मचारी शाळा सुरू झाल्याने चांगलेच आनंदित झाले आहेत. कळंबोली येथील सुधागड विद्या संकुलात आलेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन विद्यालयाच्या वतीने स्वागत करण्यात आले. कोरोनाचे सर्व नियम व अटी पाळून आज शाळा भरवल्या गेल्या अन् अनु घुमला पुन्हा ज्ञानदानाचा गजर.

कोरोना महामारीमुळे शाळेची घंटा तब्बल अडीच वर्षे वाजलीच नाही. काही विद्यार्थ्यांनी शाळा न पाहताच पहिली तून दुसरी पर्यंत थेट मजल मारली. विद्यार्थी व पालक ज्याप्रमाणे शाळेत मुलांना पाठवण्यात उत्सुक होते त्याच प्रमाणे विद्यालयातील शिक्षक ही विद्यार्थ्यांची अंतःकरणापासून वाट पाहत होते. अन् १ डिसेंबर चा दिवस तो आनंदी दिवस बुधवारी उजाडला. शाळेची घंटा, शाळेचा परिपाठ शाळे मधील शिकवणे, शाळेतील तो किलबिलाट पुन्हा सर्वांच्या कानी पडू लागला. शासनाने घालून दिलेल्या भल्यामोठ्या .../२

# उरणजवळ कंटेनर ट्रेलरला अपघात

**दै.रायगड नगरी । उरण**

चिर्ले– वेश्वी रस्त्यावर कंटेनर टेलरला अपघात झाला असून या अपघातात मोटारसायकल स्वार बचावला आहे. सदर अपघात हा बुधवारी सकाळच्या सुमारास कोटक यार्ड जवळ झाला आहे.

नवीमुंबई वाहतूक यंत्रणेने दास्तानफाटा ते दिघोडे या नागरिकांच्या रहदारीच्या रस्त्यावर सकाळी अवजड वाहनांच्या रहदारीला प्रवेश बंदी घातल्याचा निर्णय शासनस्तरावरून घेण्यात आला आहे. मात्र नवीमुंबई वाहतूक यंत्रणेच्या आणि शासनाच्या निर्णयाला हार ताळ फासण्याचे काम या परिसरातील कंटेनर यार्डच्या मालकांनी केले आहे.

राजरोसपणे सकाळी अवजड वाहनांची रेलचेल सदर रस्त्यावर सुरु केली आहे. त्यामुळे सदर रस्त्यावर अपघाताचे प्रमाण अधिक बळावले आहे. त्यात काल १ डिसेंबर बुधवारी सकाळी सदर रस्त्यावरून जाणाऱ्या कंटेनर टेलरला अपघात होण्याची घटना चिर्ले गावाजवळील कोटक यार्ड जवळ घडली. या अपघातात मोटारसायकल स्वार बाल– बाल बचावला आहे. दास्तान फाटा ते दिघोडे या रस्त्यावर अपघाताचे प्रमाण वाढले आहे.

## प्रवासी संघाच्या प्रयत्नांना यश

# पनवेल-अंधेरी लोकल गोरेगावपर्यंत धावण्यास सुरुवात ; प्रवाशांमध्ये उत्साहाचे वातावरण

### पनवेल रेल्वे स्थानकात लोकलला प्रवासी संघाने दाखवला हिरवा झेंडा



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल येथून अंधेरी येथे जाणाऱ्या रेल्वे–सेवेला आता गोरेगाव पर्यंत नेण्यासाठी पनवेल प्रवाशी संघटनेने केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले. आज ०१ डिसेंबर रोजी हिरवा कंदील दाखवून या रेल्वेसेवेचा शुभारंभ भारतीय रेल्वेचे सल्लागार समिती सदस्य अभिजित पां. पाटील, डॉ.भक्तिकुमार दवे यांच्याहस्ते झेंडा दाखवून करण्यात आला. यावेळी उपस्थित प्रवाशांनी आनंद व्यक्त केला.

आज दिनांक १ डिसेंबर २०२१ रोजी पनवेल स्थानकातून अंधेरी येथे जाणारी रेल्वे गोरेगांवपर्यंत जाण्यासाठी सज्ज झाली. यावेळी भारतीय रेल्वेच्या सल्लागार समितीचे सदस्य अभिजित पां. पाटील, प्रवाशी संघटनेचे अध्यक्ष डॉ. भक्तिकुमार दवे, श्रीकांत बापट, राष्ट्रवादीचे नेते सुदाम पाटील, पनवेल रेल्वे प्रबंधक मीना आदींनी या रेल्वेला हिरवा झेंडा दाखवून या सेवेचा शुभारंभ केला.

यावेळी बोलताना डॉ.भक्तिकुमार दवे यांनी सांगितले की, आम्ही गेले कित्येक वर्षे प्रवाशांच्या सेवेत काम करीत आहोत. अनेक प्रवाशी वेगवेगळ्या प्रकारच्या तक्रारी आमच्याकडे मांडतात आणि त्यांना न्याय देण्यासाठी आम्ही कायम प्रयत्नशील राहतो. आज सुरू झालेली गोरेगाव ही रेल्वेसेवा प्रशंसनीय तर आहेच मात्र आमची मागणी खऱ्या अर्थाने तेव्हाच पूर्ण होवू शकेल ज्यावेळी ही रेल्वेसेवा पनवेल ते बोरिवली पर्यंत प्रवाशांच्या सेवेत रुजू होईल. आम्ही प्रवाशांना होणाऱ्या गैरसोयी टाळण्यासाठी जे प्रयत्न निष्ठेने केले आहेत त्यात आम्हाला यश हे मिळेलच, यात शंका नाही. यावेळी भारत सरकारच्या रेल्वे मंत्रालय सल्लागार समितीचे सदस्य अभिजित पां. पाटील यांना रेल्वेच्या समस्यांबाबत विचारले असता त्यांनी सांगितले की, ज्या दिवशी मी या समितीवरील पदाचा पदभार स्वीकारला त्याच दिवसापासून नागरिकांना रेल्वे प्रशासनाबाबत कोणत्या अडचणींचा सामना करावा लागत आहे, त्यातून कोणता मार्ग काढावा यासाठी काम करीत आलो आहे. पनवेल रेल्वे स्थानकाचा विचार करता त्यावेळी येथील शौचालयाची झालेली दुरावस्था, मोडकळीस आलेली बसण्यासाठीची आसने, पिण्याच्या पाण्याची होत असलेली गैरसोय याबाबत प्राथमिक स्वरूपात प्रयत्न केले आणि त्याला रेल्वे प्रशासनाने दिलेल्या उत्तम साथीमुळे आज प्रवाशीवर्गाला समाधान लाभत आहे. आपण एक पदाधिकारी जरी असलो तरी प्रवाशी आणि प्रशासन यांच्यामधील एक दुवा आहोत, आपल्याला जितके चांगले काम करता येईल तितके चांगले काम करण्याच्या दृष्टीने आपण प्रयत्न करीत राहणार असल्याचे सांगितले.

# संवाद तेथे करावा !

राजधानीत विरोधक आणि सत्ताधारी यांच्यात दिसणारी तेढ आणि तणाव जवळपास शत्रुत्वाच्या पातळीवर जातो आहे. संसदीय लोकशाहीच्या प्रवासात असा कटू प्रसंग केवळ १९७५ मध्ये इंदिरा गांधी यांनी लादलेल्या आणीबाणीत आणि नंतरच्या जनता राजवटीने चौकशी आयोग नेमले, तेव्हाच आला होता. संसदेचे अधिवेशन सुरू झाले खरे; पण त्यात कामकाज होण्याऐवजी बहिष्कार आणि कलहच अधिक झडत आहेत. साधारणपणे एका अधिवेशनात गैरवर्तनाबद्दल झालेली कारवाई पुढच्या अधिवेशनात उदारपणे माफ केली जाते किंवा कमी तरी केली जाते. सोमवारी सुरू झालेल्या संसदेच्या अधिवेशनात असे होण्याऐवजी पावसाळी अधिवेशनातील गैरवर्तनाबद्दल १२ विरोधी खासदारांना हिवाळी अधिवेशनाच्या उर्वरित काळासाठीही निलंबित करण्यात आले. या खासदारांमध्ये शिवसेना, तृणमूल, डावे असे सगळेच आहेत. गेल्या अधिवेशनात राज्यसभेत जो प्रकार झाला आणि धक्काबुक्की झाली, ती लाजिरवाणी आणि संतापजनक होती. त्या गोंधळानंतर आठ केंद्रीय मंत्र्यांनी पत्रकार परिषदेत दोषी सदस्यांवर कारवाई करण्याची मागणी केली होती. राज्यसभेचे सभापती व्यंकय्या नायडू यांनी नेमलेल्या चौकशी समितीनेही कारवाईची शिफारस केली असली तरी सभापतींनी ती आपल्या अधिकारात सौम्य करायला हरकत नव्हती. 'सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यास सरकार तयार आहे,' असे पंतप्रधान नरेंद्र मोदी आता सांगत असले तरी हे अधिवेशन सुरू होण्यापूर्वी जी सर्वपक्षीय बैठक झाली; तिला ते गैरहजर राहिले. तेथे राजनाथ सिंह यांनी सरकारचा पक्ष मांडला. मोदींनी या बैठकीत हजर राहायला हवे होते. त्यातून, सरकारची संवादाची इच्छा अधिक स्पष्ट झाली असती. या सरकारकडे स्पष्ट बहुमत असले तरी त्यामुळे संवादाची गरज संपत नाही. सरकारने कृषी विधेयके आणली; तेव्हा सर्व विरोधी नेत्यांशी कितपत संवाद साधला गेला होता? पंतप्रधानांच्या आवडत्या धक्कातंत्रानुसार काही दिवसांपूर्वी टीव्हीवर तीनही कृषी विधेयके रद्द केल्याची घोषणा झाली. तेव्हाही, संसदेचे हिवाळी अधिवेशन तोंडावर आले होते. नाहीतरी, संसदेत नव्याने विधेयके मांडून ती पारित झाल्याशिवाय कायदे मागे घेण्याची प्रक्रिया पुरी होणार नव्हती. मग पंतप्रधान या माघारीसाठी अधिवेशन सुरू होईपर्यंत थांबले का नाहीत? कृषी कायदे माघारी घेण्याची विधेयके दोन्ही सभागृहात मंजूर झाली; तेव्हाही अतोनात गोंधळ झाला आणि 'आवाजी मतदाना'ने ती मंजूर झाली. हे कायदे मागे घेतानाच संसदेत सविस्तर चर्चा घडवून आणण्याची संधी होती. ती वाया गेली आहे. लोकसभा तसेच राज्यसभेचे अध्यक्ष व सभापती यांनी ठरविले तर सरकारला या प्रकरणी सविस्तर निवेदन करण्याचे निर्देश ते देऊ शकतात. संसदेचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी प्रत्यक्ष सभागृहापेक्षा बाहेर सरकार पक्ष आणि विरोधक यांच्यात दिलखुलास संवाद असावा लागतो. त्याचा सध्या अगदी वरपासून अभाव दिसतो. पंतप्रधानांनी भेट कुणाची घेतली तर, माजी पंतप्रधान व शेतकरी नेते एच. डी. देवेगौडा यांची. या भेटीतून कदाचित सहानुभूती मिळेल. पण देवेगौडांच्या पक्षाचे खासदार ते किती? त्यापेक्षा राहुल गांधी, ममता बॅनर्जी, उद्धव ठाकरे, एम. के. स्टॅलिन, नवीन पटनाईक या नेत्यांशी थेट बोलणे अधिक महत्त्वाचे होते. तशी चर्चा झाली असती तर संसदेत विरोधकांचे सहकार्य मिळूही शकले असते. शेतकऱ्यांच्या आंदोलनाचा प्रश्न तीन कायदे मागे घेतल्याने संपलेला नाही. राजधानीच्या सीमेवर शेतकरी बसून आहेतच. 'केंद्र सरकारने किमान आधारभूत किमतीचा कायदा केल्याशिवाय आम्ही जाणार नाही,' असे शेतकरी नेते राकेश टिकैत म्हणत आहेत. अशावेळी, तीन कायदे मागे घेतले हा 'मास्टर स्ट्रोक' असल्याची चर्चा समाज माध्यमांमध्ये पेरून तिचे भरघोस पण आभासी पीक काढता येईल. मात्र, त्याने वास्तव कसे बदलणार? काँग्रेसचे राज्य असताना संसदेला विश्वासात न घेता अनेक निर्णय घेण्यात आले, ही टीका तर आज गैरलागूच आहे. मतदारांनी त्यांना निरोप देऊन, तुम्हाला बहुमत दिले आहे ना? मग लोकप्रतिनिधींशी वारंवार चर्चा करणे, सर्व पक्षांना विश्वासात घेणे आणि संसदेचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी चार पावले स्वत:हून पुढे जाणे, या गोष्टी हे सरकार का करीत नाही? दुसरीकडे, संसद भवनात झालेल्या राज्यघटना दिनाच्या कार्यक्रमावर विरोधकांनी बहिष्कार घालणे, ही चूकच होती. तो एका पक्षाचा कार्यक्रम नव्हता. तिथे मोदींनी 'कौटुंबिक पक्ष व लोकशाही' हा विषय मांडला. त्याकडेही विरोधकांनी मोकळेपणाने पाहायला हवे. 'लोकशाही म्हणजे संवाद' या अत्यंत मूलभूत प्राणतत्त्वापासून आपण दिवसेंदिवस दूर जातो आहोत. 'तुटे वाद, संवाद तेथे करावा। विवेके अहंभाव हा पालटावा,' असे समर्थ रामदासांनी म्हटले आहे. वाद सोडून संवाद करायचा तर अहंकार टाकून विवेकाचा मार्ग धरावा लागतो. घोडे तिथेच पेंड खाते आहे की काय?

# श्रीवर्धन- बोर्लीपंचतन रस्त्याला वाली कोण ? ग्रामस्थांचा संतप्त सवाल

## श्रीवर्धन येथील बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

**दै.रायगड नगरी । दिघी**

दिघी – बोर्लीपंचतन परिसरातील अनेक गावांना श्रीवर्धन तालुक्याला जाणाऱ्या मुख्य रस्त्याची दुरुस्तीची मागणी मागील दोन महिने होत आहे. मात्र, लोकप्रतिनिधी, अधिकारी यांचे दुर्लक्ष यामुळे रस्त्याचे काम आजही अर्धवट आहे. किंबहुना त्रास होतो फक्त सामान्य जनतेलाच. सद्यस्थितीत रस्त्याचे काम न केल्याने रस्ता धोकादायक बनत आहे.

तालुक्यातील दिघी, सर्वे व बोर्लीपंचतन क्षेत्रातील चाळीसहून अधिक गावांचा प्रवास या मुख्य रस्त्यावर अगणित पडलेल्या खड्ड्यातून होत आहे. या खड्ड्यांच्या दुरुस्तीसाठी मागील दोन महिन्यापासून मागणी होत आहे. सद्या दुरुस्तीसाठी रस्त्यावर टाकलेल्या खडीला सात दिवसांहुन अधिक कालावधी उलटला आहे. आता खडी खड्ड्यात कधी पडणार याकडे प्रवाशांचे लक्ष लागले आहे. तरीही सुस्तावलेले सार्वजनिक बांधकाम खाते मात्र, तत्काळ डांबरीकरण करण्याऐवजी कोणत्या मुहुर्ताची वाट पाहते ? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.



तसेच हा मार्ग पुणे, मुंबई इतर जिल्ह्याकडे जाणारा. मात्र, वाढत्या खड्ड्यांमुळे मुख्य रहदारी असणारा रस्ता सद्यस्थितीत प्रवासाकरीता धोकादायक ठरत आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वी बांधकाम खाते अनेक रस्त्यांची डागडुजी तात्पुरत्या स्वरूपात वार्षिक निधीतून करते. परंतू, यंदा अनेक रस्त्यावर ही डागडुजी करण्याची गरज असतानाही या खात्याने त्याची तसदी घेतली नाही. पावसामुळे खड्डे भरता आले नाही असे नेहमीच कारण देण्यात येते. आता पावसाळ्याचे कारण संपल्यावर रस्ता दुरुस्तीचे काम लवकरच करण्यात येईल अशी माहिती बांधकाम विभागाकडून देण्यात आली. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कामांची चांगलीच गुणवत्ता दिसत आहे. तरी रस्त्याच्या सद्याच्या परिस्थितीनूसार दुरुस्तीकडे श्रीवर्धन तालुका लोकप्रतिनिधीने गांभीर्याने लक्ष द्यावे. अशी मागणी जनमाणसातुन केली जात आहे.

रस्त्याच्या दुरुस्ती कामात दिरंगाई झाल्याने बुधवारी सुरू झालेल्या पावसाने पुन्हा पूर्ण रस्ता चिखलात गेला आहे. संबंधित विभागाने वेळेत कामाची तसदी घेतली असती तर आमचा धोकादायक प्रवास टळला असता अशी प्रवाशी वर्गातून संतापजनक प्रतिक्रिया मिळत आहेत.

# पेणमध्ये अवकाळी पाऊस जनजीवन विस्कळीत




**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्याला अवकाळी पावसाचा तडाखा बसला असून तालुक्यातील वडखळ, गडब, खारपाले, आमटेम, कळवा, हमरापुर, जोहे, डोलवी, आदि गावांसह तालुक्यात अवकाळी मुसळधार पाऊस पडल्याने येथील जनजिवन विस्कळीत झाले आहे. तर शेतकऱ्यांनी गुरासाठी ठेवलेला सुका चारा भिजल्याने शेतकऱ्यां समोर गुरांच्या वैरणीचा प्रश्न निर्माण झाला आहे.

पेण तालुक्यात अवकाळी पाऊस पडल्याने येथील जनजिवन विस्कळीत झाले आहे शेतकऱ्यांनी मळणीचे कामे आत्ताच पुर्ण केली होती व राहीलेला सुका पेंढा गवत गुरासाठी शेतातच एकत्र करुन ठेवला जातो हा सुका चारा अवकाळी आलेल्या मुसळधार पावसाने भिजल्याने तो कुजण्याची शक्यताा आसल्याने गुरांना आता सुका चारा कुठुन आणायचा हा प्रश्न शेतकऱ्यां समोर पडला आहे तर शेतकऱ्यांनी वाल पावट्यांची लागवट केली होती. परंतु अवकाळी पावसामुळे वाल, पावट्याच्याा उत्पादनावर परिणाम होवुन शेतकऱ्यांना नुकसानीला सामोरे जावे लागणार आहे. तर काही ठीकाणी शेतात पाणी साचल्याने शेतकऱ्यांनी लावलेली कडधान्याच्या पिकावर परिणाम होवुन उत्पादनात घट होणार आहे.

# पाऊस बळीराजाची चिंता ; मळण्यांच्या भाताला आले मोड

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांवात सकाळ पासुनच पाऊस सुरु झाला तो दिवसभर पडत राहील असा पक्का अंदाज आहे. रिमझीम बरसत आकाशात मळभ दाटून आले आहेत. पडणारा पाऊस आणि धुकं, हवेत गारवां जाणवत असुन अगदी पावसाळी वातावरण तयार झाले आहे.

अनेक भागातील मळण्या भिजल्या भाताला कोंब फूटले पावसाने भाताच फव झाल. मळण्यांना, भाताला मोड आल ! अशा प्रतिक्रिया शेतकरी वर्गातून ऐकावयास मिळत आहेत.

तालुक्यात फार मोठ्या प्रमाणावर भाजीपाला, कलिंगड, काकडी, कडधान्य शेती केली जाते. अशा प्रकारे पडणारा पाऊस आणि विचीत्र हवामानाचा फार मोठा फटका बसणार असल्याचे येथिल शेतकरी वर्गाचे म्हणने आहे. वाल, मुग, मटकी, कुळीथ ही कडधान्य शेती, थंडीत पडणारे दव यावर ती जोमदार होते. परंतु पावसाने आता भिजुन बुरशी येणे, किड लागणे यामुळे या पिकांचे मोठे नुकसान होईल. अशी बळीराजा चिंता व्यक्त करीत आहे.

# पोलिसाला मारहाण करणाऱ्या रिक्षा चालकाला नागरिकांनी दिला चोप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खांदेश्वर पोलीस ठाण्यातील एका पोलीस कर्मचाऱ्याला मारहाण करणाऱ्या रिक्षा चालकाला नागरिकांनी पकडून बेदम मारहाण केल्याची घटना खांदा कॉलनीत घडली. अरुण यशवंत पवार असे या रिक्षा चालकाचे नाव असून खांदेश्वर पोलिसांनी त्याला सरकारी कामात अडथळा आणून पोलिसाला मारहाण करुन शिवीगाळ केल्याप्रकरणी अटक केली आहे.

या घटनेतील तक्रारदार पोलीस शिपाई अतुल मोहिते (३२) हे खांदेश्वर पोलीस ठाण्यात कार्यरत असून गत रविवारी ते खांदा कॉलनीतील शिवाजी चौकात नाकाबंदीच्या कर्तव्यावर होते. नाकाबंदीवर असलेल्या पोलिसांकडून संशयास्पद वाहनांची तपासणी करण्याचे काम सुरु असताना, आरोपी अरुण पवार हा आपल्या ताब्यातील रिक्षा घेऊन पनवेल माथेरान रोडने भरधाव वेगात शिवाजी चौकात येत होता. मात्र पुढे सुरु असलेली नाकाबंदी पाहून रिक्षा चालक अरुण पवार याने आपल्या रिक्षाला अचानक ब्रेक मारुन तो उलट्या बाजूने पनवेलच्या दिशेने पळून गेला होता. मात्र हा प्रकार नाकाबंदीवर कर्तव्यावर असलेले पोलीस शिपाई अतुल मोहिते यांनी पाहिला होता. तसेच सदर रिक्षाची काच फुटल्याचे त्यांच्या निदर्शनास आले होते. दरम्यान, नाकाबंदीवरील ड्युटी संपवुन मोहिते हे रात्री सव्वा आठ वाजण्याच्या सुमारास पोलीस ठाण्यात जात असताना, नाकाबंदीत पोलिसांना पाहुन पळून गेलेली काच फुटलेली रिक्षा व त्याचा चालक हे मोहिते यांच्या निदर्शनास आले. त्यामुळे मोहिते यांनी सदर रिक्षा चालकाला पकडून त्याच्याकडे पळुन जाण्याचे कारण विचारले असता, त्याने अरेरावीची भाषा करुन मोहिते यांना शिवीगाळ करुन त्यांना मारहाण करण्यास सुरुवात केली. हा प्रकार पाहून त्या भागात जमलेल्या नागरिकांनी पोलिसांकडे विचारपुस केली असता, सदरचा रिक्षा चालक हा नाकाबंदीत पळून गेल्याचे तसेच तो चोर असण्याची शक्यता असल्याचे सांगितल्यानंतर नागरिकांनी रिक्षा चालक अरुण पवार याला पकडून बेदम मारहाण केली. या मारहाणीत रिक्षा चालक अरुण पवार हा जखमी झाल्यानंतर त्याठिकाणी पोलिसांना पाचारण करण्यात आले. त्यानंतर पोलिसांनी अरुण पवार याच्यावर रुग्णालयात उपचार करुन त्याला सरकारी कामात अडथळा आणून मारहाण केल्याप्रकरणी अटक केली आहे. पोलिसांकडून अरुण पवार याची पुढील चौकशी करण्यात येत आहे.

## हर्षला तांबोळी आणि नारायण लक्ष्मण तांबोळी चॅरीटेबल ट्रस्ट

# पनवेलतर्फे महिलांमध्ये सॅनिटरी नॅपकीनची जनजागृती आणि सॅनिटरी नॅपकीनचे वाटप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अंदाड गावात तसेच पनवेल–तक्का आदिवासी ग्रामीण विभागात हर्षला तांबोळी आणि नारायण लक्ष्मण तांबोळी चॅरीटेबल ट्रस्ट, पनवेल अंतर्गत सॅनिटरी नॅपकीनची जनजागृती करण्यासाठी जिल्हा परिषद शाळा अंदाड या ठिकाणी हळदी कुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महिलाना सॅनिटरी नॅपकीनचे वाटप करण्यात आले. पनवेलच्या हर्षला तांबोळी यांच्यासोबत विजया चौधरी, विशाखा कापडी, गौरी जगे, तन्वी तांबोळी, सुमन आणि संजय बोराडे हे उपस्थित होते.

पनवेल तालुक्यात राहणाऱ्या हर्षला तांबोळी आणि नारायण लक्ष्मण तांबोळी चॅरीटेबल ट्रस्ट यांच्यातर्फे कोरोनाच्या काळात अनेक गोर –गरीब नागरिक आणि रस्त्यावरील फिरस्ते याना मदत करण्यात आली. हर्षला तांबोळी यानी महिलांमध्ये सॅनिटरी नॅपकीनची जनजागृती करण्याचे ठरवले आहे. यासाठी त्या मेहनत घेत आहेत. वयात येणाऱ्या प्रत्येक मुलीला मासिक पाळी येतेच. प्रजननासाठी मासिक पाळी अत्यावश्यक असते. होणारा रक्तस्त्राव आणि त्यामुळे डाग पडू नयेत यासाठी काळजी घेणं गरजेचं असते. मासिक पाळीच्या दिवसांमध्ये पॅड्स वापरणं हा पर्याय असतो. कारण पॅड्स वापरायला सोपे आणि सुरक्षित असतात. मासिक पाळी आल्यानंतर सुरुवातीला पॅड्स वापरणं कधीही उत्तम असते. मासिक पाळीच्या दिवसांमध्ये पॅड्स वापरणं हा पर्याय असतो. पॅड्स वापरायला सोपे आणि सुरक्षित असतात. सॅनिटरी नॅपकिन वापराला १८८० नंतर सुरुवात झाल्याचा उल्लेख आढळतो. हे नॅपकिन्स अस्तित्वात येऊन सुमारे सव्वाशे वर्षे झाली असली तरी अजूनही भारतात ते सर्व स्तरांपर्यंत पोहोचू शकलेले नाहीत. सॅनिटरी नॅपकीन, टॅम्पून्स, कप्स ही कोणत्याही ऐशोआरामाची गोष्ट नाही. मासिक पाळीच्या दिवसांमध्येही दिवसभर बाहेर राहून काम करणे किंवा शाळा–कॉलेजात जाणे यासाठी कापड फारसे सोयीस्कर नाही.

कापड त्वचेसाठी चांगले असले तरी नोकरी करणाऱ्यांसाठी किंवा शाळा–कॉलेजच्या निमित्ताने दिवसभर बाहेर राहणाऱ्यांसाठी सॅनिटरी नॅपकीन, टॅम्पोन्स, कप्स या गोष्टी सोयीस्कर ठरतात. अंदाड गावात तसेच पनवेल–तक्का आदिवासी ग्रामीण विभागात हर्षला तांबोळी आणि नारायण लक्ष्मण तांबोळी चॅरीटेबल ट्रस्ट, पनवेल अंतर्गत सॅनिटरी नॅपकीनची जनजागृती करण्यासाठी महिलाना सॅनिटरी नॅपकीनचे वाटप करण्यात आले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## विद्या संकुलात किलबिलाट ; शिक्षक, विद्यार्थी, पालक आनंदीत

अटींसह पालक शाळा ही मुलांना शाळेत पाठवण्यास सज्ज झाली होती. एकीकडे कोरोना महामारीचे संकट तर दुसरीकडे विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी यांची सांगड घालत व समन्वय साधून शाळांनी आज शाळा भरविल्या. सुधागड विद्यालयातील प्राथमिक विभागांमध्ये आज पहिली ते चौथी मधील मुले मुली तब्बल पावणे दोन वर्षांनी शाळेत आले. काही विद्यार्थी चौथी तुं पास होऊन पाचवी ते गेले तर काही विद्यार्थी पहिलीत शाळेत न येता दुसरीच्या वर्गात बसले. त्यामुळे मुलांमध्ये एक वेगळा उत्साह व आनंद दिसून येत होता. मुलांप्रमाणे पालक व शिक्षक वर्गामध्ये तेवढाच आनंद ओसंडून वाहत होता. मुलांशी थेट असणारे नाते आज बऱ्याच मोठ्या कालावधीनंतर जोडले जाणार होते त्यामुळे शिक्षक वर्गातही कमालीची उत्सुकता होती. आज पहिल्याच दिवशी मोठ्या संख्येने विद्यार्थी शाळेत दाखल झाल्याने त्यांचे नियोजन सुस्थितीत विद्यालय प्रशासनाने केले होते. विद्यालयाच्या वतीने मुलांचे स्वागत करण्यासाठी रांगोळीचा सडा ही टाकण्यात आला होता. विविध रंगाच्या फुग्यांनी शाळा सजवली होती. शाळा सुरू करण्या प्रारंभी सरस्वती व शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये यांच्या प्रतिमेचे पूजन करून श्रीफळ वाढविण्यात आला. प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापिका हेमलता पाटील यांनी पुष्पगुच्छ व पेन्सिल भेट देऊन स्वागत केले. कळंबोली विद्या संकुलाचे प्रमुख व प्राचार्य राजेंद्र पालवे यांनी याबाबत बोलताना सांगितले की पहिली ते सातवीपर्यंतची शाळा मोठ्या कालावधीनंतर भरल्या आहेत. त्यासाठी पूर्वतयारी विद्यालय व प्रशासनाने पार पडली आहे. शासनाने घालून दिलेल्या सर्व अटींची पूर्तता विद्यालय प्रशासन करण्यास सज्ज आहे. पालकांचेही सहकार्य तेवढेच महत्त्वाचे असून ते विद्यालयाला मिळतही आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी ही विद्यालय प्रशासन घेणार असून विद्यार्थी पालक व शिक्षकांन मध्ये कमालीचे उत्साहाचे वातावरण दिसून आले आहे. भविष्यातही काटेकोरपणे नियमाची अंमलबजावणी करून शाळा भरवून विद्यार्थ्यांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणले जाणार आहे.

# अवकाळी पावसामुळे चाकरमान्यांची धावपळ ; शेतीसह विटभट्टींचे नुकसान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आज पडलेल्या अवकाळी पावसामुळे मोठ्या प्रमाणात चाकरमान्यांची धावपळ झाली आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील शेतकरी बांधवांचे शेतीसह विटभट्टीचे मोठे नुकसान झाले आहे.

रायगड जिल्ह्यात तीन दिवस हवामान खात्यातर्फे अवकाळी पावसाचा इशारा दिला होता. त्याचप्रमाणे आज पहाटेपासून या पावसाला सुरूवात झाल्याने सकाळी कामावर जाणाऱ्या चाकरमान्यांची चांगलीच धावपळ झाली व त्यांना भिजत भिजत रेल्वे स्टेशन व एस.टी.स्टॅण्ड गाठावे लागले. या पावसाचा फटका पनवेल परिसरात चांगलाच बसला आहे. ग्रामीण भागामध्ये अनेक शेतकरी बांधवांचे या अशा अवकाळी पावसामुळे शेतीसह इतर पिकांचे नुकसान होत आहे. तसेच या कालावधीमध्ये मोठ्या प्रमाणात वीटभट्टी लावण्यात येते. परंतु अशा पावसामुळे वीटभट्टीचे सुद्धा नुकसान झाल्याने शेतकरी राजा हतबल झाला आहे. पावसाबरोबर दमट वातावरण झाल्याने याचा परिणाम आरोग्यावर सुद्धा होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

## थंडीच्या दिवसात पावसाच्या सरी, रब्बी पिकांचे मोठे नुकसान

# सुधागडात अवकाळी पावसाने शेतकऱ्यांची उडाली तारांबळ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मागील वर्षभरापासून ऋतुचक्र पूर्णपणे बदलले आहे, कधी उन्हाळ्यात पाऊस, तर कधी पावसाळ्यात कडक उन्ह तर हिवाळ्यात मुसळधार पाऊस अशी वातावरणातील परिस्थिती व हवामानबदल ऋतुचक्र बदलल्याचे संकेत देत आहे. सुधागड पाली सह जिल्ह्यात ऐन थंडीच्या दिवसात पावसाने हजेरी लावली, व हवेत प्रचंड गारवा निर्माण केला. ऐन हिवाळ्यात राज्यात काही ठिकाणी अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. अचानक आलेल्या या पावसामुळे अनेकांची तारांबळ उडाली आहे. थंडीच्या महिन्यात आलेल्या पावसामुळे अनेकांना स्वेटरऐवजी छत्री घेऊन बाहेर पडण्याची वेळ आली आहे.



गेल्या दोन दिवसांपासून काही ठिकाणी ढगाळ वातावरण पाहायला मिळत होतं. त्यानंतर बुधवारी सकाळपासून पाली सुधागड, परळी, जांभूळ पाडा, नांदगाव, शिहू, बेणसे ,चोळे गांधे, झोतिरपाडा, कुहिरे, कडसुरे, आंबेघर, वणी, यासह काही ठिकाणी पावसाच्या सरी कोसळल्या. यामुळे हवेत काहीसा गारवा निर्माण झाला आहे. मात्र रब्बी पिकांचे यामुळे मोठं नुकसान होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. हवामान बदलाचा सर्वात मोठा फटका शेतकरी वर्गाला बसतोय, कधी वादळे, कधी अवकाळी पाऊस, कधी अतिवृष्टी तर कधी परतीचा पाऊस यामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास गळून पडतो. भातशेतीचे उत्पादनात घट झालीच, मात्र आता कडधान्य, वाल आदी पिके देखील अवकाळी पावसाने अडचणीत सापडली आहेत. नैसर्गिक व आस्मानी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना सरकारची मदत देखील तुटपुंजी मिळते तर कधी त्याच्या पदरी निराशाच येत असते. सरकारने शेती व शेतकरी वाचवण्यासाठी आवश्यक ते धोरण राबविले पाहिजे, कारण शेतकरी जगला तरच देश जगेल अशी जगमान्य परिस्थिती सरकारने जाणली पाहिजे. व शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहिले पाहिजे अशी मागणी जोर धरत आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## सीकेटी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची महापालिका मुख्यालयाला भेट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका–निवडणूक विभागाच्या वतीने स्वीप २१– पद्धशीर मतदार साक्षरता आणि निवडणुक सहभाग मोहीम राबविली जात आहे. या अंतर्गत सीकेटी महाविद्यालयाच्या निवडक विद्यार्थ्यांनी पनवेल महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयाला नुकतीच भेट दिली.

पद्धतशीर मतदार साक्षरता, निवडणुक आणि नोंदणी तसेच महापालिकेच्या कामकाजाबद्दल माहिती उपायुक्त विठ्ठल डाके यांनी विषद केली. तसेच उपस्थित विद्यार्थ्यांनी महानगरपालिका व स्पर्धा परीक्षा संदर्भात प्रश्न विच–ारले, सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे यांनी समर्पक उत्तरे दिली, सहभागी सर्व विद्याथ्यार्ना सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी निवडणूक विभाग सदाशिव कवठे, विजय चव्हाण, सीकेटी महाविद्यालयाचे प्राध्यापक पारखले यांचे विशेष सहकार्य लाभले.

## रायगड जिल्हा परिषद शाळेत पहिले गोफण प्रशिक्षण शिबिर

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

भारतीय गोफण फेडरेशनच्या माध्यमातून राष्ट्रीय गोफणपटू आणि प्रशिक्षक ओंकार महादेव उतेकर यांच्या मार्गदर्शनाखाली घागरकोंड येथील रायगड जिल्हा परिषद शाळेमध्ये पहिले गोफण प्रशिक्षण शिबिर पार पडले.

गोफण या खेळाचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी फ ेडरेशन ने ग्रामीण भागापासून सुरुवात केली आहे. पोल–ादपूर या अतीदुर्गम ग्रामीण भागातील घागरकोंड शाळेपासून या प्रशिक्षण वर्गाची सुरुवात झाली आहे. शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षकांनी देखील आवर्जून या प्रशिक्षण शिबिरात भाग घेतला.

१७ वर्षे वयोगटाखालील खेळाडूंचा गट आणि प्रौढगटासाठी वयाची मर्यादा नसल्यामुळे सर्व इच्छूक खेळाडू या स्पर्धेत भाग घेऊ शकतात. हा खेळ सांघिक आणि वैयक्तिकरित्या देखील खेळला जातो. पारंपारिक परंतु क्रीडा क्षेत्रात गोफण नव्याने उदयास आल्यामुळे सर्व स्थरावर याची दखल घेतली जात आहे.

गोफण या ऐतिहासिक वारसा असलेल्या खेळाला आज आंतरराष्ट्रीय क्रिडा प्रकारचा दर्जा मिळाला आहे. शालेय क्रिडा प्रकारात समावेश देखील करून घेण्याचे प्रयत्न फेडरेशनमार्फत सुरू आहेत. लवकरच जिल्हा, राज्य आणि राष्ट्र स्थरीय स्पर्धांचे आयोजन देखील फेडरेशन मार्फत केले जाणार आहे.

# श्रीवर्धनच्या शाळा मुलांच्या हजेरीने गजबजल्या ; विद्यार्थ्यांसह पालकांचा उत्साह

**दै.रायगड नगरी । दिघी**

अवकाळी पावसाची सुरुवात आणि शाळा सुरू होण्याचं दिवस तब्बल दीड वर्षानंतर पुन्हा श्रीवर्धन तालुक्यातील मुलांच्या शाळा हजेरीने गजबजल्या आहेत. ग्रामीण भागांमध्ये शाळा सुरु होताच पहिल्या दिवशी वर्ग खोल्या बोलू लागल्याने, कोरोना संकटानंतर शैषणिक दृष्टीने हा दिवस शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी उत्साही ठरला.



कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लावण्यात आलेल्या लॉकडाऊन आणि अन्य निर्बंधांमुळे जवळपास दीड वर्षांहून अधिक काळ बंद असलेल्या राज्यभरातील काही शाळा आजपासून पुन्हा सुरु होत आहे. यामध्ये श्रीवर्धन तालुक्यातील जिल्हा परिषद, नगरपालिका, अनुदानित व खाजगी मिळून पहिली ते चौथी पर्यंतच्या एकूण ११६ शाळा सुरू झाल्या आहेत. कोरोना अनुषंगाने शाळेत सर्व नियमांचं काटेकोरपणे पालन करण्यात येत आहे.


शासनाकडून शाळा सुरु करण्यासंदर्भात निर्णय घेतल्याने विद्यार्थ्यांसोबतच पालकांनी आनंद व्यक्त केला आहे. तर येथील ५५२ शिक्षक – शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे लसीकरण झालं असून या सर्वांचा आढावा घेण्यात आला आहे. यावेळी प्रत्येक शाळेला अधिकाऱ्यांनी भेट देऊन दोन दिवस अगोदर कोरोना पाश्र्वभूमीवर सूचनाचे पालन करण्यासाठी विद्यार्थ्यांमधील सोशल डिस्टंसिंग, मास्क–सॅनिटायझर या सर्व नियमांचं पालन करुन शाळा सुरू करण्याची व्यवस्था तालुक्यातील शालेय शिक्षण विभागाने केली आहे. कोरोनाचा नवा व्हेरिएंटमुळे दक्षता घेण्याची सूचना आरोग्य विभागाकडून देण्यात येत आहेत. शाळा सुरु होत असल्या तरीही करोनाचा धोका अद्यापही पूर्णपणे टळला नसल्याने सर्व नियमांचं काटेकोरपणे पालन करण्याचे स्पष्ट आदेश शासन–प्रशासनाकडून देण्यात आले आहेत.

# तळा तालुक्यात अवकाळी पावसाने शेतकरी हवालदिल ; कडधान्ये, फळ पिके धोक्यात

**दै.रायगड नगरी । किशोर पितळे**

**तळा** : तळा तालुक्यात परतीच्या पावसाने कोकणात भातशेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असतानाच अवकाळी पावसाचे मोठे संकट शेतकऱ्यांवर आले आहे.

गेली दोन वर्षात संकटावर संकटाची मालिका सुरुच आहे नोव्हेंबर २०१९पासून कोरोना महामारी, निसर्ग चक्रीवादळ, तोक्तेवादळ, अवकाळी पाऊस मान्सून पुर्व पाऊस परतीचा पाऊस, प्रचंड पावसाने भात शेती पाण्यात कुजली अशा संकटावर मात करीत असतानाच आता अवकाळी पाऊस. तालुक्यात भात शेती नंतरकडधान्ये पिके मोठ्या प्रमाणावर घेतली जातात. परंतु अवकाळी पाऊस पडल्याने कडधान्ये, वाल पावटा, मटकी, चवळी, मुग हरभरा अशा विविध प्रकारच्या कडधान्ये, आंबापिके या पावसामुळे होणार नाहीत. काही जणांनी कडधान्ये पेरणी केली असल्याने केलेली मेहनत वाया जाणार आहे. संसार कसा करायचा व घर खर्च कसा भागवायचा मोठ्या आर्थिक विवंचनात सापडला आहे.



शेती कर्ज परतफेड कशी करायची कोरोना काळात सर्वाच्या नोकरी व्यवसाय वर गदा आली असून थोडे फार स्थिरावले जात असताना या पावसामुळे तळा तालुक्यात मोठे नुकसान झाले आहे.निसर्ग राजा तु तरी आता आम्हाला जगु दे अशी विनवणी बळीराजा शेतावर करीत आहे. कोकणात यावर्षी विक्रमी पाऊस झाला असून तालुक्यात यावर्षी अवकाळी पावसाने भात पिकाचे कडधान्ये अंतर्गत पिके यांचेमोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने झालेल्या नुकसानी बाबत सरसकट आर्थिक भरपाई मिळावी अशी मागणी शेतकऱ्यांतून करण्यात आली आहे.

# ओवे डोंगरावर पुन्हा वणवा; शेकडो झाडे जळून खाक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील खारघर येथील ओवे डोंगरावर मोठ्या प्रमाणात वणवा पेटला. या वणव्यात मोठ्या प्रमाणात वनसंपदा खाक झाली असून, वन्यप्राण्यांच्या जिवालाही धोका निर्माण झाला आहे. डोंगरावर पर्यटकांच्या नावाखाली येणाऱ्या मद्यपींकडून वणवा पेटविला जात असल्यामुळे वनविभाग कर्मचारी हतबल झाले आहेत.

खारघर सेक्टर–३४, तळोजा मध्यवर्ती कारागृह ते तळोजा तलाव लगत असलेल्या डोंगरावर मोठ्या प्रमाणात वनसंपदा आस्तत्वात आहे. गेल्या ५–७ वर्षांत महाराष्ट्र राज्य सरकारच्या वृक्ष लागवड उपक्रमांतर्गत तसेच विविध सामाजिक संस्थांनी मोठ्या प्रमाणात ओवे डोंगरावर वृक्षारोपण केले आहे. मात्र, या वनसंपदेचे संवर्धन होण्याऐवजी दरवर्षी हिवाळ्यात लागणारा वणवा आणि वन्यप्राण्यांच्या शिकारीसाठी आग लागण्याच्या घटना समोर येत असतात. चालू नोव्हेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात खारघर सेक्टर– ३४ लगत असलेल्या डोंगरावर वणवा लागला होता. यावेळी काही झाडे जळून खाक झाली होती. त्यावेळी रात्री काही पर्यावरण प्रेमींनी आग आटोक्यात आणली होती. सिडको जलकुंभ शेजारील डोंगरावर वणवा लागला. या वेळी ॲड. जे. पी. खारगे, प्रितपाल सिंग आणि इतर काही व्यक्तींनी वणवा विझविण्याचा प्रयत्न केला.

मात्र, आगीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असल्यामुळे त्यांचे प्रयत्न अपुरे पडले. दरम्यान, वन विभागाला वणवा लागल्याची माहिती मिळताच वनविभाग कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन रात्री नऊ वाजताच्या सुमारास वणवा विझविला. खारघर मधील डोंगरावर दिवाळी नंतर लागणाऱ्या वणव्यामुळे मोठ्या प्रमाणात वनसंपदेची हानी होत असते. त्यामुळे नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन पर्यावरण प्रेमींनी केली आहे. खारघर आणि ओवे डोंगर परिसरातील वनसंपदा नष्ट होवू नये म्हणून डोंगरलगत असलेल्या आदिवासी पाड्यात सभा घेवून नागरिकांमध्ये जनजागृती केली जाते. त्यामुळे ग्रामस्थांकडून सहकार्य देखील मिळते. मात्र, निसर्गरम्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डोंगरावर दरदिवशी अनेक पर्यटक येतात. काही लोक पर्यटकांच्या नावाखाली दारु पार्टी करताना सिगारेट पिऊन सिगारेट विझविण्याऐवजी फेवून पसार होतात. सदर प्रकार संध्याकाळी होतात. त्यामुळे आग विझविण्यात मोठी अडचण निर्माण होते. नागरिकांनी डोंगरावर आग न लावता वनसंपदा सुरक्षित राहावी यासाठी वन विभागाला सहकार्य करण्याची गरज आहे, असे वन विभाग कर्मचाऱ्यांनी सांगितले.



# अवकाळी पावसामुळे मुरुड परिसरातील जनजीवन पुन्हा विस्कळीत

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने आज पहाटेपासून पडत असलेल्या अवकाळी पावसामुळे मुरुड तालुक्यातील नांदगाव–मजगांव, बोर्ली–मांडला परीसरातील जनजीवन विस्कळीत झाले असून शेतकरी–बागायतदारांच्या चिंतेत वाढ झाली आहे. दुपार नंतर पावसाचा जोर वाढला असून साळाव–मुरुड रस्त्यावर अनेक ठिकाणी तसेच बोर्ली स्थानकावरील रस्त्यावर खड्ड्यात पाणी साचून वाहनचालकांना आपली वाहने चालवताना कसरत करावी लागत आहे. या पावसामुळे हवेत गारवा निर्माण झाला आहे.

भारतीय प्रादेशिक हवामान खात्याने दिनांक३० नोव्हेंबर रोजी दिलेल्या माहितीनुसार नुसार दक्षिण–पूर्व अरबी समुद्र, मालदीव, लक्षद्वीपवर चक्रियस्थिती असून तेथून पूर्व–मध्य अरबी समुद्रात द्रोणीय स्थिती आहे. त्यामुळे येत्या २४ तासात दक्षिण–पूर्व अरबी समुद्र, मालदीव, लक्षद्वीपमध्ये कमी दाबाच्या क्षेत्राची शक्यता राहील. त्यामुळे रायगड जिल्ह्यात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ / सोसाट्याचा वारा आणि काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

त्याचाच परिणाम आज पहाटेपासून पडत असलेल्या या अवकाळी पावसामुळे नांदगाव, मजगांव, बोर्ली, मांडला गावांसह दुर्गम ग्रामीण भागातील जनजीवन विस्कळित झाले आहे.शेतात पेरलेल्या वाल,रताळी आदी. फळभाजी–पाला व आंबा पिकावर या पुन्हा आलेल्या अवकाळी पावसामुळे परिणाम होण्याची भिती व्यक्त होत असून येथील शेतकरी व बागायतदारांच्या चिंतेत अधिक वाढ झाली आहे.




### जाहीर नोटीस

सर्व लोकांस जाहीर कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल नामे श्री.सुनील कुमार पांचारिया, पत्ता : ४४/३, ५ मेन ८, कॉस कृष्णप्पा बॉल्क, गंगानगर, आर.डी.नगर, बँगलोर ५६००३२ यांनी खालील वर्णिलेल्या स्थावर मिळकतीबाबत मे.एस.के.कन्स्ट्रक्शन्स तर्फे भागीदार १) श्री.कमरुद्दीन सुभानी पटेल, २) श्री.शेखर भालचंद्र तांडेल, पत्ता : शॉप नं.६४, ६५, ६६, सेक्टर २७, नेरुळ, नवी मुंबई ४००७०६, यांचे बरोबर दिनांक २६/११/२०२१ रोजी भूखंड विक्री करार केलेला आहे व सदर मिळकत त्रिपक्षीय करारनाम्याने हस्तांतरीत करून घेत आहे.

तरी सदर मिळकती संबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क, वारस हितसंबंध, गहाण, ताबा, दान, बक्षिस, पोटगी, विक्री, विश्वस्त, कुळ, वहिवाट, ॲटेचमेंट इ. अगर अन्य कोणत्याही स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील सही करणार यांचे कार्यालयात खालील प्रमाणे दिलेल्या पत्यावर समक्ष येवून भेटावे जर अशी लेखी खबर अथवा हरकत सदर मुदतीत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार अथवा हितसंबंध नाही अगर तसा असल्यास त्याने सोडून दिलेला आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पुरा करतील हे सर्वांस कळावे व त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व त्यास आमचे अशिल जबाबदार राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|
| ULVE-1G | १७ | १४० | ४० |

दिनांक : ०१/१२/२०२१
नवी मुंबई

**सही/–**
**ॲड.देवेंद्र भिका पाटील**
**शॉप नं.१, श्रीजी सोहम, सी.एच. एस.लि., भूखंड क्रं.७६, सेक्टर २१, उलवे, नवी मुंबई–४१०२०६**



श्री.भाकरे कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
ॲड.स्वानंद भा. नवाळे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१४८९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०३/०१/२०२२

श्रीमती.लोचना मोहन लोहार, वगैरे — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, मौजे : खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : खारघर, जि.रायगड येथील सदनिका नं.बी–१०५, पहिला मजला, एसीई को.ऑप.हौ.सोसायटी, प्लॉट नं.५८, सेक्टर ११, नवी मुंबई, खारघर, रायगड ४१०२१०**

कै.मोहन रामचंद्र लोहार, हे दि.१४/०८/२०१९ रोजी मयत पावले असून, त्यांना अर्जदार क्र.१) श्रीमती.लोचना मोहन लोहार, २) श्री.मयुर मोहन लोहार, ३) श्री.राहूल मोहन लोहार व ४) कु.माधुरी मोहन लोहार, सबब अर्जदार हेच कै.मोहन रामचंद्र लोहार यांचे कायदेशीर वारस आहेत.

अर्जदार यांनी कै.मोहन रामचंद्र लोहार यांच्या मृत्यूच्या पश्चात वारस दाखला मिळणेसाठी मे.दिवाणी न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करण्यासंबंधी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी त्यांचे वकीलांमार्फत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात सादर करावी. विहित मुदतीत हरकत सादर न केल्यास मे.न्यायालयात योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील, तसेच मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.१/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

**सही/** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



राव साहेब
अर्जदारांतर्फे वकील ॲड.सुधीर एस. म्हात्रे
आणि कल्याणी एस. पाटील म्हात्रे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर, यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१६८५/२०२१
नि.नं.८/ड

१) श्रीमती.सिद्धी सतीश कुडवा
२) कु.सिद्धेश सतीश कुडवा
अ.पा.क.अर्जदार नं.१
अर्जदार नं.१ व २ राहणार : बी–३०२,
वर्धमान सी एच एस लि., प्लॉट नं.४० ए,
सेक्टर नं.१२, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ यांचे वडील कै.श्री.सतीश सुरेश कुडवा हे दि.२४/०४/२०१७ रोजी मौजे : एम.जी.एम. हॉस्पिटल कामोठे येथे मयत झाले आहेत. त्याअर्थी अर्जदार मी, श्रीमती.सिद्धी सतीश कुडवा व इतर १ यांनी कै.श्री.सतीश सुरेश कुडवा यांच्या खालील वर्णनाच्या मिळकतींबाबत कै.श्री.सतीश सुरेश कुडवा यांचे सदर अर्जदार हेच वारसदार असल्याबाबत वारस सर्टीफिकेट मिळणेकरिता अर्ज दाखल केलेला आहे. मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतींचे वर्णन : बी–३०२, वर्धमान सी एच एस लि., प्लॉट नं.४० ए, सेक्टर नं.१२, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**

वरील अर्जदार हे मयत यांचे वारसदार आहेत. या हक्काबद्दल कोणत्याही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या कोर्टात एक महिन्याच्या आत हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची कार्याही करील आणि ते जर कै.श्री.सतीश सुरेश कुडवा यांचे वारस असल्याचे शाबीत झाल्यास त्यांस वारसदाखला मंजूर करील, याची दखल घ्यावी.

आज दि.२९/११/२०२१ रोजी माझी सही, न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



**अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण पनवेल यांचे न्यायालयात**
पत्ता : पहिला मजला, कृषी उत्पन्न बाजार समिती बिल्डींग, रायगड बाजार जवळ, मार्केड यार्ड, पनवेल–४१०२०६

३२ ग दावा क्रमांक : टेनन्सी/एसआर/२९–२०२१

### जाहीर नोटीस

१) श्री.गजानन हासुराम ठाकूर
२) श्री.हरिश्चंद्र हासुराम ठाकूर
दोघेही रा.साई, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार/कुळ
विरुद्ध
१) श्री.चंद्रकांत दिगंबर देशपांडे
रा.साई, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाले/जमीनमालक

**जमिनीचे वर्णन**

| तालुक्याचे नाव | गावाचे नाव | भूमापन क्र. (सर्व्हे नं.) | पोट हिस्सा क्रमांक | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|---|
| पनवेल | साई | १९१ | ७ | ०–३३–०<br>०–६६–० पोख | ०.५६ |

अर्जदार यांनी अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, पनवेल यांचे न्यायालयात वरील जमिनीचे जमीन मालक आहेत व महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ चे कलम ३२ ग प्रमाणे खरेदी किंमत होणेकरिता अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, पनवेल यांच्या न्यायालयात दिनांक २४/०८/२०२१ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

तरी या दाव्यामध्ये हितसंबंध असलेल्या अर्जदार व सामनेवाले स्वतः किंवा त्यांचे अधिकृत वारस अगर प्रतिनिधी यांनी सुनावणीच्या दिवशी व वेळी आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह या न्यायालयात उपस्थित राहून काही सांगावयाचे असल्यास किंवा तिला हरकत घ्यावयाची असल्यास दिनांक १४/१२/२०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता ठिकाण पनवेल येथे शेतजमीन न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी आपणांस (आपल्या विधीतज्ञांमार्फत) न्यायाधिकरण यावरुन फर्मावित आहे. जर नेमलेल्या वेळी व ठिकाणी न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी आपण (आपल्या विधीतज्ञांमार्फत) कसूर कराल व तर त्याबाबतीत आपणांस काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरण्यात येईल आणि आवश्यक त्या चौकशीच्या कामांत गैरहजेररीत सुरूवात करण्यात येईल व प्रकरणाच्या गुणवत्तेनुसार निर्णय दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०१/१२/२०२१

**सही/–**
**अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण पनवेल, रायगड**



मा.श्री.सोनावणे साो. यांचे कोर्टात

ॲड.प्रशांत भुजबळ
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१७५४/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०३/०१/२०२२

१) श्रीमती.कैलीबाई काळ्या गावंड
वय : ७८ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.जोमा काळ्या गावंड
वय : ४२ वर्षे, धंदा : शेती
३) श्रीमती.रंजना दगडू गावंड
वय : ४० वर्षे, धंदा : गृहिणी
४) श्री.आकाश दगडू गावंड
वय : २० वर्षे, धंदा : शिक्षण
५) कु.संगीता दगडू गावंड
वय : १७ वर्षे, धंदा : शिक्षण
६) कु.संजीवनी दगडू गावंड
वय : १५ वर्षे, धंदा : शिक्षण
नं.५ व ६ अज्ञान पालनकर्ती
म्हणून अर्जदार नं.३ आई
सर्व रा.वाघिवली, पो.पारगांव,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. धोंड्या पद्या पाटील उर्फ गावंड यांचे निधन दि.१०/११/१९६५ रोजी झालेले आहे. तसेच कै.धोंड्या पद्या पाटील उर्फ गावंड यांची आई कै.मंगळी पद्या गावंड उर्फ पाटील यांचे निधन दि.०५/०९/१९६१ रोजी झालेले आहे. तसेच कै.धोंड्या पद्या पाटील उर्फ गावंड यांची पत्नी कै.जोमू धोंड्या पाटील उर्फ गावंड यांचे निधन दि.२२/०५/१९५५ रोजी झालेले आहे. कै.धोंड्या पद्या पाटील उर्फ गावंड यांचा मुलगा कै.काळ्या धोंड्या गावंड यांचे निधन दि.११/०७/२००३ रोजी झालेले आहे. त्याचप्रमाणे कै.धोंड्या पद्या पाटील उर्फ गावंड यांचा मुलगा कै.काळ्या धोंड्या गावंड यांचा मुलगा कै.दगडू काळ्या गावंड यांचे निधन दि.२४/०५/२००९ रोजी झालेले आहे. कै.धोंड्या पद्या पाटील उर्फ गावंड हे मयत झालेले असल्याने श्रीमती.कैलीबाई काळ्या गावंड वगैरे ह्यांनी कै.धोंड्या पद्या पाटील उर्फ गावंड यांच्या मालकीची खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मौजे : बंबावी, ता.पनवेल, जि.रायगड**

| यु. केस नं. | स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| ३४ | ४३ | १२ | ०–४३–५<br>पो.ख. ०–१०–० | २.०६ |

वर नमूद मिळकतीच्या संपादनापोटी सिडकोकडून १२.५ टक्के योजनेप्रमाणे कै.धोंड्या पद्या पाटील उर्फ गावंड यांना मौजे : उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथे अंदाजे ४५० चौ.मी. क्षेत्राचा भूखंड वितरित करण्यात येणार आहे.

श्रीमती.कैलीबाई काळ्या गावंड वगैरे हे कै.धोंड्या पद्या पाटील उर्फ गावंड यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्रीमती.कैलीबाई काळ्या गावंड वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.धोंड्या पद्या पाटील उर्फ गावंड यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.३०/११/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## अल्पवयीन मुलीचा पनवेल शहर पोलिसांनी घेतला शोध

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एक १३ वर्षीय अल्पवयीन मुलीचे तिच्या राहत्या घरातून कोणी तरी अज्ञात इसमाने तिच्या कुटुंबियांच्या कायदेशीर रखवालीतून फूस लावून पळवून नेले होते. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच विशेष पथकाने सदर मुलीला ताब्यात घेतले आहे.

सदर गुन्हा दाखल होताच व.पो.नी.अजय कुमार लांडगे, यांनी दिलेल्या सूचना प्रमाणे पळवून नेलेल्या मुलीचा मोबाईल बाबत तांत्रिक तपास करून व गोपनीय माहिती मिळवून शोध घेतला असता सदरची मुलगी धमोत, नेरळ तालुका कर्जत येथे मुला सोबत असल्या बाबत माहिती प्राप्त झाली होती त्या मुळे सदर ठिकाणी जावून शोध घेतला असता पळवून नेलेली मुलगी ही त्याच्या ताब्यात मिळून आल्याने त्यांना ताब्यात घेवून मुलीस तिच्या वडिलांच्या ताब्यात देण्यात आले असून ,फुस लावून पळवून नेलेल्या मुलास सदर गुन्ह्यात अटक केली आहे.

## कापडे बुद्रुक येथे मोटार सायकलच्या धडकेने मुलगा जखमी

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील पोलादपूर महाबळेश्वर रस्त्यावर सायंकाळी भरधाव मोटारसायकल चालविणाऱ्या तरूणाच्या बेपर्वाईमुळे एका बालकास धडक बसून तो गंभीर जखमी झाला. विना-परवाना विना इंश्युरन्स वाहन चालविणाऱ्या या तरूणाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलादपूर तालुक्यातील कापडे बुद्रुक येथील कंक कार वॉशिंग ॲण्ड सर्व्हिस सेंटरच्या समोर कृष्णा दादा गोळे वय २६ रा.मुगांव, चिखली, ता. वाई, जि.सातारा या तरूणाने सायंकाळी पावणेआठ वाजण्याच्या सुमारास भरधाव वेगाने एमएच ११ सीबी ९२५१ ही भरधाव वेगाने रस्त्याच्या परिस्थितीकडे दूर्लक्ष करून चालविली. यावेळी आर्यन सुनील कंक, रा.रानवडी, ता. पोलादपूर हा १२ वर्षाचा बालक रस्ता ओलांडत असताना त्यास मोटारसायकलीने धडक देऊन गंभीर स्वरूपाची इजा करण्यास कारणीभूत ठरला आहे. याप्रकरणी सहायक पोलीस निरिक्षक प्रशांत जाधव यांनी अपघातस्थळी भेट देऊन पाहणी केली. जखमी बालकाला तातडीने पोलादपूर ग्रामीण रूणालयामध्ये उपचारासाठी पाठविण्यात आले.


### वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


# लढा सुरू ठेऊ, पण एसटी कामगारांनी कामावर हजर व्हा : विलास खोपडे

## रायगड जिल्ह्यातील ८८० कर्मचारी कामावर हजर

**दै.रायगड नगरी । पेण**

आठ नोव्हेंबर पासून सुरू असणारा एसटी कर्मचाऱ्यांचा संप हळूहळू संपुष्टात येऊन पुन्हा एकदा एसटी कर्मचाऱ्यांचे कार्यालयीन कामकाज पूर्वपदावर येत असल्याचे संकेत मिळत आहेत. परिवहन मंत्री अनिल परब आणि कृती समिती यांच्यातील झालेल्या बैठकीनंतर कृती समितीने प्रतेक जिल्ह्यातील विभागीय अध्यक्ष आणि विभागीय सचिव यांना आपल्या जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांना कामावर हजर होण्याची विनंती करण्याचे आदेश दिले असल्याची माहिती विभागीय अध्यक्ष विलास खोपडे यांनी दिली. त्यामुळे हे आंदोलन क्षमण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

> कृती समितीने दिलेल्या आदेशानुसार आम्ही जिल्ह्यातील आंदोलनकर्ते कर्मचाऱ्यांना कामावर हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. त्या आदेशाचे काटेकोर पालन आमचे कर्मचारी करत आहेत. बरेच कर्मचारी बाहेरगावी राहत असल्याने ते उद्यापर्यंत कामावर हजर होऊ शकतात. मात्र आमच्या मागण्यांसाठी कृती समितीचे जे आदेश येतील त्याचे पालन करून आम्ही विलीनीकरणासह आमच्या इतर मागण्या नक्कीच पूर्ण करण्यात यशस्वी होऊ.
>
> **विलास खोपडे, विभागीय अध्यक्ष - रायगड**



कृषी समितीच्या आदेशानुसार विभागीय अध्यक्ष खोपडे आणि सचिव गणेश शेलार यांनी आपल्या जिल्ह्यातील आंदोलक कर्मचाऱ्यांना आपले आंदोलन आपल्या वरिष्ठांच्या आदेशानुसार आणि निर्णयानुसार वेगळ्या मार्गाने सुरु राहील, मात्र आपण आता तातडीने कामावर हजर व्हा अशा प्रकारची विनंती केली आहे. या विनंतीचा मान राखत आता हळूहळू काही कर्मचारी कामावर हजर होत आहेत.

रायगड जिल्हा विभाग नियंत्रक अनघा बारटक्के यांनी दिलेल्या माहितीनुसार या दोन दिवसात एकूण ८८० कर्मचाऱ्यांनी आपले कामकाज सुरू केले आहे. तर १३७ गाड्यांच्या फेऱ्या आज पूर्ण झाल्या आहेत.

दोन दिवसांपूर्वी २४६ कामगार हजर झाले होते. आज हा आकडा ८८० वर गेल्याने कामगारांची कामावर हजर होण्याची संख्या वाढत असल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले आहे आणि सर्वच्या सर्व कर्मचाऱ्यांनी लवकरात लवकर हजर व्हावे असे आवाहन देखील बारटक्के यांनी केले आहे.

> कर्मचारी कामावर हजर होण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. त्यांचे आम्ही स्वागत करत आहोत . कोकणातील तळागाळातील प्रवाशांना एसटीचाच प्रवास मान्य असल्याने त्यांच्या या पसंतीचा मान राखुन आणि त्यांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन इतर कर्मचाऱ्यांनी देखील लवकरात लवकर कामावर हजर व्हावे.
>
> **अनघा बारटक्के,**
> **विभाग नियंत्रक - रायगड**

## उजळोली पाझर तलावाच्या २ कोटी किंमतीच्या दुरूस्ती प्रस्तावास शासनाची मान्यता

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

खालापूर तालुक्यातील उजळोली पाझर तलावाच्या तब्बल रु.२ कोटी ६१ लक्ष ८ हजार ७८० इतक्या किंमतीच्या दुरुस्ती प्रस्तावास सातत्याने वैयक्तिक पाठपुरावा करून शासनाची मान्यता मिळविण्यात पालकमंत्री कु. आदिती तटकरे यशस्वी झाल्या आहेत.

खालापूर तालुक्यातील उजळोली येथील पाझर तलाव हे काम उजळोली गावाच्या स्थानिक नाल्यावर सन १९८८ मध्ये रायगड जिल्हा परिषद यांच्यामार्फत पूर्ण झाले होते. ही योजना 'मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेंतर्गत दुरुस्ती कार्यक्रम आराखड्यात प्राधान्य क्रमांक एक मध्ये आहे. या पाझर तलावाचा संकल्पित पाणीसाठा ५३१.४९ सघमी व मूळ सिंचन क्षमता ३०.४ हेक्टर असून याच्याव दुरुस्तीनंतर ३०.४ हेक्टर सिंचन क्षमता पुनर्स्थापित होणार आहे. जुलै-ऑगस्ट २०१९ च्या अतिवृष्टीमुळे या तलावाच्या दगडी बांधकामातील विहिरीजवळ गूरळ पडल्यामुळे मुख्य विमोचक, पोहोच कंड्यूट आरसीसी पाईप व त्या बाजूच्या भरावातून मोठ्या प्रमाणात पाणी गळती होत असल्याने माती धरणास धोका होऊन फुटू नाही यासाठी धरणाच्या मजबुतीकरणासह नवीन प्रचलित पद्धतीने माती धरणाचे नूतनीकरण होणे आवश्यक होते.

ही बाब जिल्हा परिषद सदस्य नरेश पाटील व ग्रामस्थ यांनी पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या निदर्शनास आणून दिली. या गोष्टीचे गांभीर्य लक्षात घेवून पालकमंत्री कु.तटकरे यांनी तातडीने या पाझर तलावाच्या दुरुस्तीच्या कामाकरिता शासनाकडे पाठपुरावा सुरू केला व त्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याअंती या पाझर तलावाच्या दुरुस्तीकरिता रु.२ कोटी ६१ लक्ष ८ हजार ७८० इतक्या किंमतीच्या दुरुस्ती प्रस्तावास वित्त विभाग, शासन परिपत्रक दि.१० नोव्हेंबर २०२० मधील सूचना विचारात घेऊन शासनाकडून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. यामुळे खालापूर तालुक्यातील उजळोली येथील या पाझर तलावाची दुरुस्ती होवून या क्षेत्रातील ३०.४ हेक्टर सिंचन क्षमता पुनर्स्थापित होणार आहे.

## नगरपंचायत निवडणुक, विविध प्रमाणपत्रांसह कर भरण्यासाठी इच्छुकांची धावपळ

**दै.रायगड नगरी । तळा**

नगरपंचायत निवडणुकीसाठी नामांकन दाखल करण्याची सुरुवात बुधवार (ता. १) पासून झाली आहे. निवडणुकीसाठी लागणारे कागदपत्रांची जुळवा- जुळव करण्यासाठी इच्छूकांची धावपळ तर सुरुच झाली पण या निमित्ताने नगरपंचायतीला नळपट्टी व घरपट्टी मिळत आहे. कोरोनामुळे खडखडाट असलेल्या नगरपंचायतच्या तिजोरीत पैशाचा भरणा होत आहे.

ऐन निवडणुकीच्या धामधुमीत आरक्षणामुळे इच्छुकांचा भ्रमनिरास झाला असला तरी निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असलेले कामाला लागले आहेत. नामांकन दाखल करण्यासाठी विविध प्रमाणपत्रासह नगरपंचायतीची थकबाकी, शौचालय असल्याचे प्रमाणपत्र, मालमत्ता कर वगळता इतर कराबाबत थकबाकी नसल्याचा व नगरपंचायतीचा ठेकेदार नसल्याचा स्वंयघोषणापत्र, गुन्हेगारी पार्श्वभुमी नसल्याचे प्रमाणपत्र, खर्चाचे हमीपत्र, १२ सप्टेंबर २००१ नंतर दोन पेक्षा जास्त अपत्य नसल्याचे प्रमाणपत्र यासह अन्य प्रमाणपत्राची गरज असल्याने राखीव प्रभागासह सर्वसाधारण गटातूनही निवडणूक लढवण्याची तयारी करत असणाऱ्यांची धावपळ सुरू झाली आहे.

निवडणूक लढवणाऱ्यासाठी नगरपंचायतीची अनेक प्रमाणपत्राची गरज असून या निमित्ताने नगरपंचायत अधिकारी वर्गाकडे संपर्क करुन कागदपत्रे काढून घेतले जात आहेत. गेल्या आठ नऊ महिण्यापासून कोरोना संसर्गामुळे जगायचे कसे हा प्रश्न निर्माण झाला असल्याने विविध कर भरण्याकडे नागरिकांचे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष झाले होते. आता मात्र लॉंकडाऊन शिथिल झाले व व्यवहारही सुरळीत होत असल्याने नगरपंचायत निवडणुकीचा हंगाम सुरु झाला. त्यामुळे शहरातील पुढारी होण्यासाठी इच्छुक असलेल्यांनी नगरपंचायतीमध्ये येवून नळपट्टी व घरपट्टी किती आहे याची विचारणा करण्याबरोबरच रक्कम भरुन बेबाकी प्रमाणपत्र घेत आहेत.

त्याचप्रमाणे गावच्या ग्रामपंचायतीच्या पोट निवडणुकीचा बिगूल वाजला असून ता. १ डिसेंबरपासून प्रत्यक्ष उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली. कधी नव्हे ते यंदा गावचे कारभारी होण्यासाठी तरुण मंडळी इच्छूक असल्याने निवडणूक लढवणाऱ्यांची संख्या वाढली आहे. उमेदवारी दाखल करतांना निवडणूक लढवणाऱ्यासाठी लागणाऱ्या सर्वच कागदपत्रांची पुर्तता करावी लागणार आहे त्यामुळे कर भरुन कागदत्रांची जुळवाजुळव करण्याची खबरदारी घेतल्या जात आहे. एरवी सरपंच, ग्रामसेवक घरपट्टी व नळपट्टी भरण्यासाठी तगादा लावत असतांना कुणीच प्रतिसाद देत नाहीत पण निवडणुकीच्या निमित्ताने अनेकजण स्वतः होवून ग्रामपंचायतमध्ये येत असल्याने ग्रामपंचायतच्या तिजोऱ्या खुलणार आहेत. गावागातील इच्छुक कर भरण्यासाठी थेट ग्रामपंचायतमध्ये येत असल्याने कोरोना काळात अर्थिक अडचणीत आलेल्या ग्रामपंचायतींना आर्थिक मद्दतीचा हात मिळणार आहे. १ ते ७ डिसेंबर २०२१ या कालावधीत नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात येतील. ४ व ५ डिसेंबर २०२१ रोजी सुट्टी असल्याने नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात येणार नाहीत. नामनिर्देशनपत्रांची छाननी ८ डिसेंबर २०२१ रोजी होईल. मतदान २१ डिसेंबर २०२१ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत असेल. २२ डिसेंबर २०२१ रोजी सकाळी १० वाजल्यापासून मतमोजणी सुरू होईल.

## निवडणुकीचे चक्रीवादळ नुसतीच हवा पैसा खाऊक उभा रहाया हवां

### कानोसा निवडणुकीच्या चक्रीवाताचा

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव नगरपंचायत निवडणुकीचे चक्रीवादळ घोंगावायला लागले आहे. परिसरात सकाळी मॉर्निंग वॉक पासून रात्री झोपे पर्यंत नुसती खलबत सुरु झाली आहेत. निवडणुकीचे आपआपले वेगवेगळे अनुभव कथन, मीठ मसाला लावुन एकमेकाशी गटा गटाने सांगताना ची कुजबूज करताना, राजकारणाची खाज असलेले व बाजुला बसुन ऐकणारे आवडीने या राजकारणाच्या कलगीतुरा मैफीलीत भाग घेताना दिसून येत आहेत.

कानोसा घेतला असता एका प्रभागात एकजण म्हणें, आपण तरी कधी उभा राह्याचा, सरल पैसा खाऊक उभा राह्या हवां! नंतर बघतायं काय करायचा तो! उमेदवारी नाय दिलींवं तर अपक्ष अर्ज भरतायं, नंतर सेटलमेंट झाली कि माग घ्यायाचा. नायतर लडवायचीच काय फरक पडतायं? अशी कुजबुज ऐकावयास मिळत आहे.




नाक्यावर, गल्लीबोळात कट्ट्यावर जिथे तिथे राजकारणाच वेड जडलेले अगदी सर्वसामान्य, कॉमनमॅन पासुन ते पट्टीचे तथाकथीत राजकिय विश्‍लेषक, पक्के राजकारणी. यातील कुणी शिवसैनिक तर कुणी राष्ट्रवादी तर कुणी भाजपायी, कॉंग्रेसी व शेकापचे चाहते जिथे जिथे म्हणुन भेटतील तिथे तिथे नुसता राजकारणाचा फड सुरु झाला आहे. म्हणतात नां आपल्याकडे क्रिकेट आणि राजकारण यावर चर्चेची गुऱ्हाळं नुसता धुरळां उडतो. अशा वेळी समजावे एखादी वर्डकप मॅच किंवा निवडणुक आली आहे. अगदी तसच वातावरण फटाफट तापायला लागलय.

सध्या माणगांव नगरपंचायत निवडणुकीच आरक्षण घोषीत झाले आणि वातावरण तापले, राजकारण जामच रंगात आलेय.

प्रत्येक प्रभागात कोणं कोणं उभ राहणार, एक दोन दिवसात उमेदवारी अर्ज दाखल व्हायला जोशात सुरुवात होणार. ज्यांना पक्षा कडुन नव्याने उमेदवारी मिळाली ते खुश झाले, पण ज्यांना नाही मिळाली ते आता बोलतायत, बाबा हल्ली निवडणुक लढविणे तेवढे सोपे राहीले नाही. पंधरा वीस लाख लागतात. साधी ग्रामपंचायत लढवायची झाली तरी एवढा खर्च येतो, अजुन कर्ज फेडतोय बाबांनो! मतदारांवर विश्वास उरला नाही. हे तर कायच नांय नुसती मटाणं पार्टी आणि दारुचा पाऊस पाडावा लागतो, आणि मतदानाच्या दिवसापर्यंत नुसत्या क्वाटरी पाजायां लागत्यात! अशी भिती घालताना ऐकावयास मिळत आहेत.

बरं हे केलं नाही, तर मतदान आपल्यावं उलटा फिरलाच म्हणुन समजा! हे सांगताना, अमुक अमुक उगाच नाय पडला; त्याचा पैसा कमी पडला. अशा चर्चा, कानोसा घेतल्यास ऐकावयास मिळत आहेत. लवकरच प्रचाराला सुरुवात होईल आता बघुया कोणाची जित आणि कोणाची हार होते ? काहीही झाल तरी नगरपंचायवर महिलाच राज करणार हे मात्र निश्चित. अशी जोरदार मनोरंजनात्मक धुमश्चक्री माणगांवात अनुभवायला मिळत आहे.

## कर्जत तालुक्यातील सर्व गावांचे ड्रोन सर्वेक्षण ; २ डिसेंबर पासून होणार सुरुवात

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील सर्व गावातील गावठाण क्षेत्र यांच्यामधील घरे, रस्ते, नाले यांच्या सीमा निश्चित करण्यासाठी सर्वे ऑफ इंडिया कडून तालुक्यातील सर्व ३३६ गावांचे ड्रोन सर्वेक्षण केले जाणार आहे. २ डिसेंबर पासून या महत्वपूर्ण प्रकल्पाची सुरुवात होणार असून ड्रोन सर्वेक्षणानंतर घरमालकांना आपल्या मिळकतीचे प्रॉपर्टी कार्ड मिळणार आहे



राज्य सरकारकडून राज्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक गावातील गावठाण क्षेत्रात असलेल्या मिळकती यांचे संरक्षण करण्यासाठी सर्वे ऑफ इंडिया चा महतवपूर्ण प्रकल्प राबविला जाणार आहे. कर्जत तालुक्यातील ३३६ गावांमधील गावठाण मिळकत यांचे सर्वेक्षण करणे मनुष्यबळ लावून करणे सोपे नाही आणि म्हणून राज्य सरकार कडून सर्व्हे ऑफ इंडिया कडून ड्रोन सर्वेक्षण करण्याचा प्रकल्प कर्जत तालुक्यात राबविला जाणार आहे. राज्य सरकारच्या माध्यमातून ग्रामविकास विभाग, महसूल व वन विभाग आणि भूमी अभिलेख यांच्या माध्यमातून हे ड्रोन सर्वेक्षण गावठाण क्षेत्र निश्चित करण्यासाठी कर्जत तालुक्यात केले जाणार आहे. ड्रोनने एकदा आकाशात झेप घेतली की एकावेळी पाच गावांचे सर्वेक्षण करण्याची किमया हा ड्रोन करु शकतो. ड्रोन सर्वेक्षणाची सुरुवात कर्जत तालुक्यात २ डिसेंबर पासून होत असून शिरसे ग्रामपंचायत मधील तमनाथ गावात या कार्यक्रमानंतर सर्वे ऑफ इंडियाचा ड्रोन आकाशात झेपावेल.

जीआयएस प्रणालीवर आधारित गावठाण निश्चित होणार असल्याने शासनाकडून नोंदवही अद्ययावत होणार असताना संगणकीय प्रणालीवर भविष्यात नकाशे निश्चित करण्यासाठी ड्रोनने केले जाणारे गावठाण सर्वेक्षण फायद्याचे ठरू शकते अशी माहिती कर्जतचे तहसीलदार विक्रम देशमुख आणि भूमी अभिलेखचे उपअधीक्षक इंद्रसेन लांडे यांनी दिली आहे. या कमी ग्रामसेवक,तलाठी,मंडळ अधिकारी, विस्तार अधिकारी, नायब तहसीलदार, गटविकास अधिकारी तहसीलदार यांच्यासह भूमिअभिलेख चे सर्व्हेअर देखील ड्रोन सर्वेक्षणात सहभागी असणार आहेत.

## जगदीश भारती यांचा महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेतर्फे सत्कार

**दै.रायगड नगरी । उरण**

गौरवमयी व उत्कृष्ट अशी ३८ वर्षाची सेवा पूर्ण करून दि. ३० नोव्हेंबर २०२१ रोजी बेलापूर नवी मुंबई येथे कार्यरत असलेले सहाय्यक पोलिस निरिक्षक जगदीश नारायण भारती सेवानिवृत्त झाले. त्यांचा सेवानिवृत्तीचा कार्यक्रम आनंदी हॉटेल उरण मधे मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमप्रसंगी महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना उरणचे वैभव शिवाजी पवार-उरण तालुका अध्यक्ष,निलेश कन्हैयालाल गोहिल-आय.टी सेल प्रमुख उरण, ॲडव्होकेट प्रीती जगदीश भारती (रांजणे)-उरण तालुका अध्यक्ष महिला आघाडी, स्नेहा सचिन गोडे- उरण तालुका उपाध्यक्ष महिला आघाडी आदी महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेचे पदाधिकारी सदस्य उपस्थित होते. या सर्वांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश भारती यांना सेवानिवृत्त बद्दल शुभेच्छा देऊन त्यांचा सत्कार केला.




## गवतात हरवला जावटे येथील रहदारीचा पुल ; कठडे गायब, प्रवाश्यांच्या जिवाला धोका



**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

सुतारवाडी पासून पाच कि.मी. अंतरावर असणाऱ्या जावटे गावाकडे जाणारा छोटा पूल हा जणु गवतात हरवला असून या पुलाचे कठडे तुटलेले असल्यामुळे या मार्गांवरुन प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे.

या मार्गावरून भाले, निजामपुर, इंदापुर, माणगाव या मार्गाकडे जाणारा नजीकचा व सुसज्ज रस्ता असल्यामुळे या मार्गावरून ट्वहीलर, रिक्षा, मिनिडोअर, फोरव्हीलर, एसटी ही वाहने जात असतात.

परंतु हा पूल अरुंद असल्यामुळे व प्रचंड वाढलेल्या गवतामुळे लवकर वाहन चालकाच्या लक्षात येत नसल्यमुळे एखादा वाहन १० ते १२ फूट खोलवर जाऊन अपघातात होऊ शकतो व कोणाचाही नाहक बळी जाऊ शकतो यामुळे असा धोका निर्माण होण्यापुर्वी संबंधित बांधकाम खाते यांच्याकडून लक्ष देणे गरजेचे आहे.

या वर्षी डिसेंबर महिना सुरु झाला तरी वेळोवेळी पाऊस पडत आहे. यामुळे जागोजागी वाढणाऱ्या गवताचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर दिसून येते. अशाच गवताने वेढलेला पुलाचा भाग जणु गायब झाला असून गेली दहा वर्षपासून या पुलाचे संवरक्षण कठडे तुटलेले असल्यामुळे या पुलाला नवीन कठडे बसविण्यात यावे अशी मागणी प्रवाशी वर्गातून केली जात आहे.